# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठे |
|---|---|---|---|
| | | प्रास्ताविक | |
| १. | प्रकरण - एक | स्थूल रुपरेषा व उद्दिष्टे | .. १-२ |
| २. | प्रकरण - दोन | साधनसंपत्तीचे वाटप करण्याबाबतचे/ ती देण्याबाबतचे निकष आणि कार्यपद्धती | .. ३-८ |
| ३. | प्रकरण - तीन | साधनसंपत्ती राखून ठेवणे व त्यांचा वापर करणे | .. ९-१० |
| ४. | प्रकरण - चार | कामे, नियोजन आणि अंमलबजावणी | .. ११-१६ |
| ५. | प्रकरण - पाच | कार्यक्रमाखाली द्यावयाची मजुरी | .. १७-१८ |
| ६. | प्रकरण - सहा | स्वतंत्र कामे | .. १९-२० |
| ७. | प्रकरण - सात | इतर कार्यक्रमांच्या जोडीने वाटचाल | .. २१-२१ |
| ८. | प्रकरण - आठ | संनियंत्रण आणि मूल्यमापन | .. २२-२४ |
| ९. | प्रकरण - नऊ | संकीर्ण | .. २५-२६ |
| १०. | | जोडपत्रे | |
| | जोडपत्र एक | ग्रामपंचायतींना करावयाच्या वाटपासंबंधीचे परिगणना पत्रक | .. २७-२७ |
| | जोडपत्र दोन | परिच्छेद ८.१ (ब) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसरा व त्यानंतरचा हप्ता देण्यासाठी केलेले प्रस्ताव | .. २८-२८ |
| | जोडपत्र तीन | उपयोगीता प्रमाणपत्र | .. २९-२९ |
| | जोडपत्र चार | जवाहर ग्राम समृद्धी योजनेअंतर्गत दुसरा हप्ता देण्याबाबतची तपासणी सूची | .. ३०-३० |

# प्रकरण - एक

## स्थूल रुपरेषा व उद्दीष्टे

१. उद्दिष्टे :

१.१. जवाहर ग्राम समृद्धी योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील.

(अ) प्राथमिक उद्दिष्टे

मागणीवर आधारित ग्रामीण पायभूत सुविधांची निर्मिती करणे, ज्यात

(एक) ग्राम स्तरावरील टिकाऊ मत्ता

(दोन) ग्रामीण गरीब जनतेला अविरतपणे रोजगाराच्या संधी अधिकाधिक लाभाव्यात या बाबींचा समावेश असेल.

(ब) दुय्यम उद्दिष्टे

ग्रामीण भागातील बेरोजगार गरीबांसाठी पूरक रोजगार निर्माण करणे.

२. समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष संरक्षक उपयोजना :

(एक) अनुसूचित जाती/अनुसुचित जमातींच्या वैयक्तिक लाभार्थी योजनेसाठी वार्षिक वाटपाच्या २२.५ टक्के रक्कम राखून ठेवण्यात येईल.

(दोन) दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाना कार्यक्रमातंर्गत वेतन रोजगार देण्यात येईल.

३. दर्जा :

३.१ केंद्र शासन व राज्य शासन यांनी ७५:२५ या प्रमाणात खर्च वाटून घेऊन केंद्र पुरस्कृत योजना म्हणून या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येईल. संघ राज्य क्षेत्राच्या बाबतीत, या योजनेतील संपूर्ण निधीचो तरतूद केंद्राकडून करण्यात येईल.

४. कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासंबंधातील पद्धती :

४.१ या कार्यक्रमाची अंमलबजावणी ग्राम पंचायतीमार्फत करण्यात येईल.

## ५. ग्रामपंचायतीची व्याख्या :

५.१ या मार्गदर्शक तत्वांमध्ये अभिप्रेत असलेला ग्राम पंचायतीचा अर्थ, निवडून दिलेली सर्वात खालची संस्था असा आहे आणि ती मध्ये ग्राम पंचायती, मंडळे, नगरपंचायती, किंवा ग्राम परिषदा आणि सांविधिक स्वरुपाची ग्रामविकास मंडळे यांसारख्या पारंपारिक ग्राम संस्थाचा समावेश होतो.

५.२ यथोचितरीत्या निवडून दिलेल्या ग्रामपंचायती अस्तित्वात नसतील तेथे, त्या पंचायतीमध्ये ग्राम समृद्धी योजना राबवण्याची ज्यांची जबाबदारी आहे त्या पंचायत समित्या त्यांच्या (ग्रामपंचायत/पंचायती) हिश्याचा निधी मंजूर करतील. तथापि, कोणती कामे हाती घ्यावयाची त्याबाबत संबंधित पंचायतींच्या ग्रामसभा गाव पातळीवर निर्णय घेतील.

## ६. वन ग्रामे :

६.१ विद्यमान ग्राम पंचायतींचा भाग नसलेली विद्यमान वन ग्रामे, ग्राम पंचायत म्हणून समजण्यात यावीत.

# प्रकरण - दोन

# साधनसंपत्तीचे वाटप करण्याबाबतचे/ती देण्याबाबतचे निकष आणि कार्यपद्धती

७. **साधनसंपत्तीचे वाटप करण्यासाठी लावलेले निकष :**

७.१. राज्यातील ग्रामीण गरीब लोकसंख्या व देशातील एकूण ग्रामीण गरीबांची लोकसंख्या यांच्याप्रमाणात किंवा शासनाने/राष्ट्रीय विकास परिषदेने वेळोवेळी ठरविलेल्या निकषानुसार, राज्यांना/संघराज्याना केंद्रीय सहाय्याचे वाटप करण्यात येईल. या प्रयोजनासाठी, नियोजन आयोगाने तयार केलेल्या दारिद्र्याबाबतच्या अंदाजाचा वापर करण्यात येईल.

७.२ जिल्हा स्तरावर, जिल्ह्यातील अनुसूचीत जाती/अनुसूचित जमातीची लोकसंख्या व राज्यातील अनुसूचित जाती/अनुसूचीत जमातींची लोकसंख्या यांच्या प्रमाणाचा समतोल विचार करुन त्या प्रमाणात आणि त्या जिल्ह्यातील शेतमजुरांचे दरडोई उत्पादन यांच्या व्यस्त प्रमाणाच्या आधारे मागासलेपणाचा निर्देशांक काढून निधीचे वाटप करण्यात येईल.

७.३ जिल्ह्यासाठी नियतवाटपाने दिलेल्या संपूर्ण निधीचे वाटप ग्रामपंचायतीमध्ये करण्यात येईल. जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे/जिल्हा परिषदा, केंद्राकडून किंवा राज्याकडून निधी मिळाल्यानंतर तो १५ दिवसांच्या आत थेट ग्रामपंचायतींना देतील. केंद्राकडून किंवा राज्याकडून अनुरुप हिस्सा मिळण्याची ते वाट पाहाणार नाहीत.

७.४ ग्रामपंचायतींना निधीचे वाटप करण्याच्या प्रयोजनार्थ १००० हून कमी लोकसंख्या असलेल्या प्रत्येक ग्रामपंचायतींची लोकसंख्या १००० इतकी असल्याचे समजण्यात येईल. तथापि, ग्रामपंचायतींना निधीचे वाटप करण्यासाठी लोकसंख्येची त्या संख्येच्या वरील संख्येची मर्यादा नसेल. यासाठी अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्या लोकसंख्येवर भर दिला जाईल. ग्रामपंचायतीसाठी राखून ठेवण्यात आलेली साधनसंपत्ती पैकी ६० टक्के अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या समायोजित लोकसंख्येच्या आणि ४० टक्के समायोजित एकूण लोकसंख्येच्या आधारे

(अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येसह) वितरित करण्यात येईल. परिगणनेची पद्धती जोडपत्र-एक मध्ये दिलेली आहे.

## ८. <u>जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे/जिल्हा परिषद यांना केंद्रीय सहाय्य देणे.</u> :

८.१ खालील शर्तीच्या अधीन राहून जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे/जिल्हा परिषदा यांना प्रत्येक वर्षी दोन हप्त्यांमधे थेट केंद्रीय सहाय्य देण्यात येईल.

(अ) <u>पहिला हप्ता</u> :

मागील वित्तीय वर्षात ज्या जिल्ह्यांना निधीचा दुसरा/नंतरचा हप्ता प्राप्त झाला असेल अशा जिल्ह्यांस पहीला हप्ता आपोआप प्राप्त होईल. परंतु मागील वित्तीय वर्षामध्ये ज्या जिल्ह्यांना दुसरा हप्ता मिळाला नसेल त्या जिल्ह्यांना परिच्छेद ८.१ (ब) खाली उल्लेख केल्याप्रमाणे आवश्यक दस्तऐवजांसह पहिल्या हप्त्यांसाठी प्रस्ताव सादर करावा लागेल.

किनौर, लाहुल व स्पिटी, लेह, कारगील यासारख्या बर्फाच्छादित असणाऱ्या थंड हवेच्या जिल्ह्यांच्या बाबतीत केंद्र सरकार व संबंधीत राज्य शासन यांच्यामध्ये आपसात निश्चित करण्यात यावयाच्या भारताच्या ईशान्येकडील जिल्ह्यांच्या बाबतीत, कामाचा मोसम मर्यादित कालावधीचा असल्यामुळे, तेथे संपूर्ण केंद्रिय सहाय्य एकाच हप्त्यात देण्यात येईल.

(ब) <u>दुसरा हप्ता</u> :

केंद्रीय सहाय्याचा दुसरा हप्ता, जोडपत्र दोननुसार विहित केलेल्या नमुन्यात जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण/जिल्हा परिषद यांनी विनंती केल्यावर खालील शर्ती पूर्ण केल्यावर देण्यात येईल.

(एक) एकूण उपलब्ध निधीच्या म्हणजेच वर्षारंभाची शिल्लक (पहिल्या हप्त्याकरिता आलेल्या प्रस्तावांच्या बाबतीत, मागील वर्षाची सुरुवातीची शिल्लक) अधिक राज्याचा हिस्सा धरुन मिळालेल्या रकमेच्या ६० टक्के इतका खर्च दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज करताना वापरण्यात आली असली पाहिजे.

(दोन) जिल्ह्याची सुरुवातीची शिल्लक म्हणजे ग्रामपंचायतीकडील एकूण शिल्लक मागील वर्षामधील जिल्हा वाटपाच्या १५ टक्क्यांहून (१९९९-२००० या वर्षासाठी २० टक्के) अधिक असता कामा नये. सुरुवातीची शिल्लक या मर्यादेपेक्षा अधिक असेल अशावेळी वाढीव रकमेइतका केंद्राचा हिस्सा दुसरा हप्ता देण्याच्या वेळी वजा करण्यात येईल.

(तीन) राज्य शासनाने त्यांच्या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने दिलेल्या रकमेइतक्याच रकमेची पुरेशी तरतूद केलेली आहे.

(चार) राज्य शासनाने, अर्जाच्या दिनांकापर्यंत देय असलेली त्याची सर्व अंशदाने (मागील वर्षे धरुन) दिलेली असली पाहिजेत. राज्याच्या हिश्श्याची रक्कम कमी असेल तर चालू वर्षाच्या दुसऱ्या हप्त्यामध्ये केंद्राच्या हिश्श्यातून तेवढीच रक्कम वजा करण्यांत येईल.

(पाच) गेल्या वर्षीच्या जवाहर ग्राम समृद्धी योजनेच्या (जवाहर रोजगार योजना १९९९-२०००) लेखा परिक्षेचा अहवाल आणि मागील वर्षीच्या लेखा परिक्षा अहवालातील अभिप्रायांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर केलेला असला पाहिजे.

(सहा) मागील वर्षी पंचायतीकडून मिळालेल्या अहवालावर आधारित जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे/जिल्हा परिषदा यांच्याकडून जोडपत्र तीनमध्ये विहित केलेल्या नमुन्यात उपलब्ध असलेले उपयोजन प्रमाणपत्र सादर केलेले असले पाहिजे.

(सात) ती रक्कम दुसऱ्या प्रयोजनार्थ वापरण्यात आलेली नाही आणि तीच्या संबंधात कोणत्याही प्रकारे अपहार झालेला नाही अशा आशयाचे प्रमाणपत्र सादर केलेले असले पाहिजे.

(आठ) सर्व निधी, बँकेच्या बचत खात्यात/टपाल खात्यात ठेवण्यात आलेला आहे हे दर्शवणारे प्रमाणपत्र.

(नऊ) ग्रामपंचायतींनी वार्षिक कृती योजना तयार केलेल्या आहेत अशा आशयाचे प्रमाण पत्र.

(दहा) या मार्गदर्शक तत्वांच्या अनुसार ग्रामपंचायती जेवढ्या निधीस हक्कदार

असतील त्यानुसार निधीचे वाटप करण्यात आलेले आहे अशा अर्थाचे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेने/जिल्हा परिषदेने दिलेले प्रमाणपत्र.

(अकरा) प्रगती/संनियत्रंण याबाबतचे सर्व प्रलंबित अहवाल पाठविण्यात आलेले असले पाहिजेत.

(बारा) जवाहर ग्राम समृद्धी योजनेखालील अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या घटकांच्या बाबतीत करण्यात आलेल्या खर्चाचा म्हणजेच ग्रामपंचायत स्तरावर मागील वर्षी राखून ठेवण्यात आलेला २२.५ टक्के निधीचा तपशील पुरवला पाहिजे. अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती यांच्यावरील खर्च कमी प्रमाणात केला गेलेला असेल तर त्या प्रमाणातील खर्चाची रक्कम (७५ टक्के) वजा करण्यात येईल.

(तेरा) (अ) दोन वर्षाहून अधिक काळापूर्वी सुरु केलेले कोणतेही काम अपूर्ण राहिलेले नाही,

(ब) मार्गदर्शक तत्वामंध्ये घालून दिलेल्या सर्व शर्तीचे पालन करण्यात येत आहे, अशा आशयांची प्रमाणपत्रे आणि वेळोवेळी लादण्यात आलेल्या इतर शर्तींचेही अनुपालन करावे लागेल.

८.२ ज्यांना एकाच हप्त्यात निधी दिला जातो अशा जिल्ह्यांच्या बाबतीत, वरील परिच्छेद ८.१ (ब) मध्ये निर्धारित केलेल्या शर्ती पूर्ण केल्यावर निधी देण्यात येईल.

८.३ सोयीसाठी प्रस्तावासोबत जोडपत्र - चार मध्ये देण्यात आलेली तपासणी सूची पुरवावी.

## ९. जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे/जिल्हा परिषदा यांना राज्य हिश्श्याच्या रकमेचे प्रदान. :

९.१ केंद्रीय सहाय्यांची रक्कम मिळाल्यानंतर, राज्य शासन एक आठवड्याच्या आत जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणांना/जिल्हा परिषदांना, आपल्या हिश्श्याची अनुरुप रक्कम देईल.

## १०. ग्रामपंचायतींना निधीच्या रकमा देणे. :

१०.१ केंद्राकडून किंवा राज्य शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर जिल्हा ग्रामीण

विकास अभिकरणे/जिल्हा परिषदा, १५ दिवसांच्या आत तो निधी ग्रामपंचायतीना वितरित करतील.

१०.२ वन ग्रामांच्या संबंधात, जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे/जिल्हा परिषदा वाटप केलेला निधी या वन ग्रामांमध्ये कार्यक्रमांतर्गत कामे हाती घेण्यासाठी त्या त्या जिल्हा स्तरावरील वन कर्मचाऱ्यांना सुपूर्द करतील. ग्रामीण समाजाच्या आवश्यकतेनुसार अनुसुचित जातीची/अनुसुचित जमातीची किमान एक व्यक्ती व एक महिला सदस्य यांचा समावेश असलेल्या पाच सदस्यांच्या समितीमार्फत जिल्हा स्तरावरील वन प्राधिकारी या निधीचा वापर करील/वन खेड्यातील कामे हाती घेईल.

## ११. <u>साधनसंपत्ती दुसऱ्या प्रयोजनार्थ वापरणे.</u> :

११.१ एका जिल्ह्यासाठी असलेली साधनसंपत्ती दुसऱ्या जिल्ह्यासाठी वापरता येणार नाही. त्याचप्रमाणे, एका ग्रामपंचायतीसाठी असलेली साधनसंपत्ती दुसऱ्या ग्रामपंचायतीसाठी वापरता येणार नाही.

## १२. <u>ग्रामपंचायतीचा वापरण्यात न आलेला अगोदरच्या वर्षातील निधी १५ टक्क्यांहून अधिक नसावा.</u> :

१२.१ ग्राम पंचायतींनी, त्यांना उपलब्ध करुन दिलेला निधी तो ज्या वर्षी उपलब्ध करुन दिला असेल त्याच वर्षी खर्च करावा. वापरण्यात न आलेला अगोदरच्या वर्षातील निधी त्या विशिष्ट वर्षी मिळालेल्या निधीच्या १५ टक्क्यांपेक्षा अधिक असेल तर (१९९९-२००० या वर्षी २० टक्के) ग्रामपंचायतीच्या अंशदानात, खर्च न केलेल्या अतिरिक्त शिल्लक रकमेइतकी रक्कम कापून घेण्यांत येईल. निधीतील अशा प्रकारे कापून घेतलेली रक्कम पंचायत समितीतील इतर पंचायतीना वितरित करण्यांत येईल.

## १३. <u>उशिरा प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या संबंधात कापण्यात येणारी रक्कम</u> :

१३.१ आर्थिक शिस्त राखण्याकरिता, राज्य शासनाने उशिरा सादर केलेल्या प्रस्तावांच्या संबंधात कपात अनिवार्य असेल. ही कपात, जवाहर ग्राम समृद्धी योजनेंतर्गत दुसरा हप्ता देण्याचा प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनाकांवर अवलंबून असेल. या

पद्धतीनुसार, जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यात प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांसाठी त्या वर्षीच्या एकूण केंद्रीय वाटपाच्या अनुक्रमे १५ टक्के आणि ३० टक्के अशी वाढती कपात करण्यात येईल. अपूर्ण प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. राज्याकडून ज्या दिनांकाला शेवटची माहिती प्राप्त होईल तो दिनांक प्रस्ताव मिळाल्याचा दिनांक समजण्यात येईल.

१३.२ वर अशी तरतूद असली तरीही (परि. ८.१) राज्याने दरवर्षी १५ फेब्रुवारी किंवा त्यापूर्वी दुसऱ्या हप्त्यासाठीचा प्रस्ताव सादर करावा १५ फेब्रुवारीनंतर मिळालेले प्रस्ताव केवळ अपवादात्मक परिस्थितीत स्विकारले जातील. फेब्रुवारीनंतर मिळालेले प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत.

## १४. बँकेत खाती उघडणे :

१४.१ जिल्हा परिषदा/जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे / ग्राम पंचायती, जवाहर ग्राम समृद्धी योजना निधी (केंद्राचे तसेच राज्याचे अंशदान) राष्ट्रीयकृत बँकेत किंवा पोस्ट ऑफिसमध्ये स्वतंत्र आणि फक्त त्याच्याकरता ठेवलेल्या बचत खात्यात ठेवतील.

## १५. ठेवींवर मिळालेल्या व्याजाचा वापर. :

१५.१ जवाहर ग्राम समृद्धी योजनेतील जमा रकमांच्या ठेवींवर आलेले व्याज जवाहर ग्राम समृद्धी योजनेच्या जादा निधीचा भाग समजण्यात येईल.

## १६. (खात्यातून) निधीच्या रकमा काढणे :

१६.१ जवाहर ग्राम समृद्धी योजनेच्या खात्यातील निधीच्या रकमा जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणे/जिल्हा परिषदा यांना फक्त ग्राम पंचायतीमध्ये निधीच्या रकमांचे वाटप करण्याकरिताच काढता येतील.

१६.२ ग्राम पंचायतीच्या खात्यातून प्रदानासाठी काढावयाच्या रकमा धनादेशाद्वारे काढाव्यात. धनादेशावर ग्राम पंचायतीने याबाबतीत ठरावाद्वारे विशेषरित्या प्रधिकृत केलेल्या वक्तीसह पंचायत प्रमुखाची स्वाक्षरी असेल. स्वाक्षरी करणारी ती दुसरी व्यक्ती ग्रामपंचायतीचा सदस्य किंवा पंचायतीचा सचिव असणे आवश्यक आहे. सर्व रकमांचे प्रदान ग्राम पंचायतीच्या बैठकीत प्राधिकृत करण्यात येईल आणि नंतरच्या बैठकीत ग्राम सभेला त्यांची माहिती पुरवण्यात येईल. इतर कोणत्याही प्रयोजनासाठी निधी काढणे अनधिकृत असेल.

# प्रकरण - तीन

# साधनसंपती राखून ठेवणे व त्यांचा वापर करणे.

## १७. साधनसंपत्ती राखून ठेवणे :

१७.१. जवाहर ग्राम समृद्धी योजनेखालील साधनसंपत्ती खालील बाबी वगळता इतर कोणत्याही विभागासाठी राखून ठेवण्यात येणार नाही.

(अ) जवाहर ग्राम समृद्धी योजनेच्या मार्गदर्शक तत्वे मधील प्रकरण सहामध्ये निर्देशिल्याप्रमाणे अनुसूचित जाती/अनुसूचित जमातींकरिता असलेल्या वैयक्तिक लाभधारकाच्या योजनांवर वार्षिक वाटपाच्या २२.५टक्के इतकी रक्कम खर्च करणे अनिवार्य आसेल. अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती करिता असलेल्या निधीचा वापर इतर कामासाठी करण्याची मुभा नसेल.

(ब) वार्षिक वाटपाच्या ३ टक्के इतकी रक्कम विकलांगाकरिता अडथळेरहित सोयी निर्माण करण्यासाठी वापरण्यात येईल. या शीर्षाखालील निधाचा वापर न झाल्यास ग्राम पंचायत त्या निधीचा वापर जवाहर ग्राम समृद्धी योजनेखालील इतर कामांसाठी करु शकेल.

## १८. प्रशासनिक / आकस्मिक खर्चासाठि तरतूद :

१८.१ ग्राम पंचायत ७.५ टक्के एवढ्या किंवा रु. ७५००/- यापैकी जी कमी असेल त्या रकमेएवढ्या कमाल मर्यादेपर्यंन्तचा निधी, दरवर्षी प्रशासनिक/ आकस्मिकता खर्च म्हणून आणि तांत्रिक सल्लामलतीसाठी खर्च करु शकेल.

## १९. मत्तांचे परिक्षण करण्यासाठी तरतूद :

१९.१ ग्राम पंचायतीला तिच्या भौगोलिक सीमेच्या आतील सार्वजनिक मत्तांचे परिरक्षण करण्यासाठी, कमाल १५ टक्के एवढा निधी खर्च करण्याची परवानगी असेल. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रम / ग्रामीण रोजगार निर्मिती प्रकल्प आणि जवाहर रोजगार योजना यांच्या भूतपूर्व कार्यक्रमांतर्गत निर्माण करण्यात आलेल्या

मत्तांचे परिरक्षण करण्याची जबाबदारी ग्राम पंचायतीची असेल.

## २०. प्रशासनिक/आकस्मिक आणि परिरक्षण खर्चामधील खर्च न केलेला निधी. :

२०.१ प्रशासनिक/आकस्मिक आणि मत्तांचे परिरक्षण करताना ग्रामपंचायतीने, त्यासाठी अत्यावशक असेल एवढाच खर्च करण्याचा प्रयत्न करावा. असा खर्च करताना काटेकोरपणे काटकसर करावी. या शीर्षाखालील खर्च न केलेल्या शिल्लक रकमा, जवाहर ग्राम समृद्धी योजनेच्या कार्यक्रम निधीचा भाग मानण्यात येतील.

# प्रकरण - चार

## कामे, नियोजन आणि अंमलबजावणी

### २१. जवाहर ग्राम समृद्धी योजनेखाली हाती घ्यावयाची कामे. :

२१.१ या कार्यक्रमांतर्गत ज्या कामांमुळे टिकाऊ, उत्पादक सामुहिक मत्तांची निर्मीती होत असेल अशी सर्व कामे त्या क्षेत्राची / लोकांची गरज ओळखून ग्रामपंचायतीकडून हाती घेता येतील. या कार्यक्रमाखाली हाती घेता येतील अशी कामे पुढील परिच्छेदांमध्ये दिली आहेत.

२१.२ पुढील क्रमाने प्राथम्यक्रम देण्यात येईल.

(अ) अनुसूचित जातीच्या / अनुसूचित जमातीच्या वस्त्यांमधील पायभूत सुविधा.

(ब) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेसाठी (एसजीएसवाय) पायाभूत संरचना.

(क) ग्राम पंचायतीमधील शेतीविषयक कामकाजांना सहाय्यभूत ठरतील अशा पायाभूत सुविधा

(ड) शिक्षण, आरोग्य आणि रस्ते यांच्यासंबंधातील सामूहिक पायभूत सुविधा.

(ई) इतर सामाजिक, आर्थिक आणि भौतिक सुविधा

हीे कामे हाती घेतांना ग्रामपंचायत, मूलभूत किमान सेवा आणि इतर केंद्र पुरस्कृत योजना किंवा राज्य शासनाच्या योजना यांच्या अंतर्गत निर्माण करण्यात येत असलेल्या सुविधा विचारात घेऊ शकेल.

उदाहरणार्थ, जवाहर ग्राम समृद्धी योजनेंतर्गत रस्ते बांधण्याचे काम हाती घेण्यात आले असेल तर रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम इतर कार्यक्रमांतर्गत केले जाईल.

२१.३. ग्रामीण भागात पायाभूत सुविधा निर्माण करताना, मागणीच्या अनुसार असतील अशा प्रकारच्या ग्रामीण क्षेत्रामधील सोयी निर्माण करण्यासाठी मजुरी आणि सामुग्री यांच्या संबंधातील ६०:४० हे प्रमाण योग्य अशा प्रकारे शिथिल करता येईल. तथापि, ज्या कामांच्या बाबतीत केवळ सामुग्रीचे प्रमाण बरेच असेल अशी कामे हाती घेतली

जाणार नाहीत याची खबरदारी घेण्यात यावी आणि कमी खर्चाचे परवडण्याजोगे तंत्र अंतभूर्त असलेली कामगार प्रधान कामे हाती घेण्याचे प्रयत्न त्याचवेळी करण्यात यावेत. गावातील गरीबांना मजुरी मिळवता येईल अशी पूरक कामे मिळावीत म्हणून मजुरी आणि सामुग्री यांचे प्रमाण शक्यतोवर ६०:४० असे असेल.

२१.४ प्राथमिक शाळांच्या इमारतीचे महत्व लक्षात घेऊन शाळांच्या इमारती बांधण्यासाठी निधीच्या रकमा देता येतील. या रकमा खडू, फळा कार्यक्रमाखाली (ओबीबी) देण्यात येतील. हा निधी जवाहर ग्राम समृद्धी योजनेची काही बचत असल्यास तिच्यातून देण्यात येईल आणि तो प्रत्येक वर्षाच्या अखेरीस निश्चित करण्यात येईल. राज्य शिक्षण विभागाशी समन्वय साधणे आणि खडू फळा कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव सादर करणे, ही राज्य शासनाच्या ग्राम विकास विभागाची जबाबदारी राहील. केंद्र शासन आणि राज्य शासन यांचे या योजनेखालील निधीचे प्रमाण ७५.२५ एवढे असेल. या योजनेखालील निधी जिल्हा ग्राम विकास अभिकरणांना / जिल्हा परिषदांना थेट देण्यात येईल. राज्य शासनास किमान तीन वर्ग खोल्या असलेल्या शाळांचे प्रस्ताव पाठवता येतील. हा निधी जादा वर्ग खोल्यांसाठी उपलब्ध नसेल.

२१.५ या कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात यावयाच्या कामांच्या खर्चावर कमाल मर्यादा नसली तरी जी कामे स्थानिक पातळीवर कार्यन्वित केली जाऊ शकतील आणि ज्या कामांसाठी उच्च दर्जाची तंत्र सामुग्री आवश्यक असणार नाही अशी लहान प्रमाणातील आणि कमी खर्चाची व तशाच प्रकारची कामेच केवळ हाती घेण्यात यावीत. हाती घ्यावयाची कामे सर्वकंष वार्षिक कृती योजनेच्या मर्यादेत असणे अनिवार्य असेल. (परिच्छेद २२.१ अनुसार) या कार्यक्रमांतर्गत पुढील कामे हाती घेतली जाणार नाहीत.

एक) मंदीर, मशिद, गुरुद्वारा, चर्च यासारख्या धार्मिक प्रयोजनार्थ असलेल्या इमारती.

दोन) शिल्पे, स्मारके, पुतळे, मुर्ती, कमान प्रवेशद्वार

तीन) पूल

चार) उच्च माध्यमिक शाळांकरिता इमारती

पाच) महाविद्यालयांकरिता इमारती

सहा) **सिंचन तलावामधील गाळ उपसणे**

सात) गावातील रस्त्यांव्यतिरिक्त इतर रस्त्यांचे डांबरीकरण/सिमेंटीकरण.

२१.६ या कार्यक्रमांतर्गत सुरु करण्यात आलेली कामे टिकावू स्वरुपाची असावीत आणि ती कामे संबंधित काम / क्षेत्र यांच्यासंबंधात कोणतीही तांत्रिक मानके आणि विनिर्देश असतील तर ती पूर्ण करतील अशी असावीत. पंचायतींना आवश्यक वाटेल तर त्यांना गट अधिकाऱ्यांकडून अथवा त्या क्षेत्रामधील नामवंत स्वयंसेवी संस्थांकडून तांत्रिक सल्ला घेता येईल.

२१.७ कमी खर्चाचे तंत्रज्ञान आणि स्थानिक साहित्याचा वापर यांना प्रोत्साहन देण्यात येईल.

२१.८ तांत्रिक विनिर्देश निश्चित करतांना, स्थानिक साहित्य आणि विविध संस्थांनी विकसित केलेले कमी खर्चाचे तंत्रज्ञान वापरण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा.

२१.९ ग्राम पंचायतीने वरील परिच्छेद २१.६ मध्ये विहित केलेल्या रीतीने निवडलेली कामे गट स्तरावर किंवा जिल्हा स्तरावर बदलण्याची मुभा असणार नाही.

२१.१० ग्राम पंचायतीच्या कृती योजनेची तांत्रिक छाननी सुकर होण्यासाठी, पंचायत समितीचे प्राधिकारी, ग्रामपंचायत साधारणपणे जी कामे हाती घेत असते अशा कामांमधील बाबींचे प्रमाणित आकृतिबंध तयार करु शकेल आणि त्यांच्या संबंधातील खर्चास मान्यता देऊ शकेल. यामुळे ग्राम पंचायतीला कृती योजना त्वरेने तयार करण्यास मदत होईल आणि ग्राम सभेला देखील तांत्रिक छाननी त्वरित करता येईल.

## २२. वार्षिक कृती योजना

२२.१ उपरोक्त मार्गदर्शक तत्वे लक्षांत घेंऊन, प्रत्येक ग्रामपंचायत, प्रत्येक वित्तीय वर्ष सुरु होण्यापूर्वी त्याच्या आधीच्या वर्षी वाटप केलेल्या निधीमधील त्याच्या हिश्श्याच्या १२५ टक्के किंमतीच्या सममूल्य असलेली वार्षिक कृती योजना तयार करील. वार्षिक कृती योजनेचा भाग बनल्याशिवाय जवाहर ग्राम समृद्धी योजनेंतर्गत कोणतेही काम हाती घेता येणार नाही.

२२.२ वार्षिक कृती कार्यक्रम तयार करताना नवीन कामे हाती घेण्यापेक्षा, अपूर्ण

कामे पूर्ण करण्यास प्राथम्य द्यावे. एक वर्षाच्या कालावधीत किंवा जास्तीत जास्त दोन वित्तीय वर्षाच्या आत पूर्ण होऊ शकणार नाही असे कोणतेही काम ग्रामपंचायत हाती घेणार नाही.

२२.३ ग्राम पंचायतीने तयार केलेल्या वार्षिक कृती योजनेवर ग्रामसभेच्या बैठकीत तपशीलवार चर्चा करण्यात आली पाहिजे. ग्राम सभा, अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती यांच्यासाठीच्या स्वतंत्र कामांचा अंतर्भाव असलेल्या वार्षिक कृती कार्यक्रमास, मान्यता देईल. हा कार्यक्रम दरवर्षी ३१ मार्चपूर्वी पूर्ण करण्यात येईल.

२२.४ त्यानंतर पंचायत या कामांची अंमलबजावणी करील. पंचायतींना ग्राम सभेच्या मान्यतेने रु. ५०,०००/- इतक्या खर्चाची कामे/योजना पार पाडण्याचे अधिकार असतील. इतर कोणत्याही प्रशासकीय किंवा तांत्रिक मान्यतेची आवश्यकता असणार नाही. तथापि, रू. ५०,०००/- पेक्षा अधिक खर्चाची कामे/योजना यांसाठी, ग्रामसभेकडून मान्यता मिळविल्यानंतर ग्राम पंचायत समुचित प्राधिकरणाची तांत्रिक/प्रशासकीय मान्यता मिळवील.

२२.५ तांत्रिक कर्मचारीवर्ग कमी पडल्यास किंवा अन्यथा ग्राम पंचायतीने प्रकल्पांचे मूल्यमापन तांत्रिकदृष्ट्या अर्हताप्राप्त खाजगी व्यक्तीकडूनही करवून घेणे हे अनुज्ञेय असेल, राज्य शासनाने तांत्रिकदृष्ट्या अर्हताप्राप्त अशा खाजगी कर्मचारीवर्गाला नेमण्याबाबत मानके घालून द्यावीत.

## २३. कार्यान्वीयन अभिकरणे :

२३.१ हा कार्यक्रम ग्राम पंचायतीमार्फत कार्यान्वित केला जाईल आणि या योजनेचे नियोजन आणि अंमलबजावणी यासाठी ती जबाबदार असेल, तांत्रिक पर्यवेक्षण करणे ही पंचायत समिती आणि जिल्हा ग्राम विकास अभिकरण/जिल्हा परिषद यांची जबाबदारी असेल.

२३.२ जिल्ह्यातील वन विभाग हा कार्यक्रम, जवाहर ग्राम समृद्धी योजनेची मागदर्शक तत्वे आणि वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेला वन (संरक्षक) अधिनियम, १९८० लक्षात घेऊन संबंधित वनग्रामांमधील लोकांशी विचारविनिमय करुन वनग्रामामध्ये कार्यान्वित करील.

२३.३ ग्रामीण पातळीवर, कार्यक्रमाचे समन्वयन, पुनरीक्षण, पर्यवेक्षण आणि संनियंत्रण यांच्याशी संबंधित संपूर्ण कामांची जबाबदारी ग्राम पंचायतीची असेल.

२३.४ जिल्हा स्तरावर, जिल्हा ग्राम विकास अभिकरणे/जिल्हा परिषदा आणि मधल्या स्तरावर पंचायत समित्या मार्गदर्शन, समन्वय, पर्यवेक्षण नियतकालिक यांसाठी आणि संनियंत्रण यासाठी संपूर्णतः जबाबदार असेल. जिल्ह्यात अंमलबजावणीसाठी हाती घेतलेल्या कामाशी संबंधीत विवरणे/प्रतिवेदने वेळेवर सादर करण्यात येत आहेत याच्या संबंधात खात्री करुन घेण्यासाठी जिल्हा ग्राम विकास अभिकरणे / जिल्हा परिषदा राज्य शासनास जबाबदार असतील.

## २४. <u>हजेरीपट</u> :

२४.१ कामगारांना प्रदान केलेल्या वेतनाचा तपशील दर्शविणारा प्रत्येक कामाचा स्वतंत्र हजेरीपट ठेवण्यात येईल. सर्व कामांच्या हजेरीपटामध्ये अनुसूचित जाती/ अनूसुचीत जमाती / महिला आणि नोकरीत असणाऱ्या इतरांची संख्या व तपशील दर्शविणाऱ्या नोंदी असतील. हजेरीपट तयार करण्यासाठी जे जबाबदार असतील तेच या नोंदींसाठीदेखील जबाबदार असतील. वेतन न देणे किंवा कमी वेतन देणे किंवा हजेरीपटात हातचलाखी करणे यास प्रतिबंध करण्यासाठी हजेरीपट शिवलेला असावा आणि त्याच्या सर्व पृष्ठांना क्रमांक देणे हे अनिवार्य असेल.

२४.२ पंचायतीच्या सरपंचाने प्रमाणित केलेल्या हजेरीपटाच्या प्रती प्रत्येक ग्राम सभेपुढे ठेवण्यात येतील. तसेच लोकांनी मागणी केल्यास त्या त्यांनाही उपलब्ध करुन दिल्या जातील.

## २५. <u>कंत्राटदारांवरील बंदी</u> :

२५.१ या कार्यक्रमाखालील कोणतेही काम कार्यान्वित करण्यासाठी कंत्राटदारांना कामावर नेमण्याची परवानगी असणार नाही. या कार्यक्रमाखालील काम कार्यान्वित करण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची किंवा इतर कोणत्याही मध्यस्थ अभिकरणाची नेमणूक करण्यात येऊ नये. कामगारांना प्रदान करण्यात यावयाच्या वेतनाचा संपूर्ण लाभ त्यांनाच मिळाला पाहिजे आणि कामाच्या खर्चामध्ये अशा कंत्राटदारास, मध्यस्थास किंवा मध्यस्थ अभिकरणास देय होणा-या दलालीवरील (कमिशन) खर्चाचा अंतर्भाव असू नये.

## २६. निर्माण केलेल्या मत्तांचे अभिलेख :

२६.१ प्रत्येक ग्राम पंचायत आणि गट / जिल्हा या कार्यक्रमांतर्गत निर्माण करण्यात आलेल्या मत्तांची वस्तूसूची ठेवील, यात प्रकल्प सुरु केल्याचा आणि पूर्ण केल्याचा दिनांक, आलेला खर्च, मिळालेला लाभ, निर्माण केलेला रोजगार आणि इतर संबंध्द बाबी, यांचा अंतर्भाव असेल. हा तपशील दर्शविणारे फलक कामांच्या जवळच्या ठिकाणी लावण्यात येतील. कामास प्रारंभ करण्यापूर्वीचे, काम चालू असतानाचे आणि काम पूर्ण झाल्यानंतरचे अशा प्रकारच्या छायाचित्रांच्यां स्वरुपात कामाच्या कार्यान्व्यनातील विविध टप्प्यांचा अभिलेख ही ठेवता येईल.

## २७. कामाची लेखापरीक्षा :

२७.१ या योजनेमध्ये केलेल्या कामाची भौतिक तसचे वित्तीय अशा दोन्हीही प्रकारच्या लेखापरीक्षा सक्तीच्या असतील, प्रत्येक जिल्हयामध्ये वित्तीय वर्षाच्या अखेरीस लेखा परीक्षा पार पाडण्यात येतील. या लेखापरीक्षा स्थानिक निधी लेखापरिक्षक किंवा राज्य शासनाने नियुक्त केलेले सनदी लेखापाल यांच्याकडून करण्यात येतील. पुढील वित्तीय वर्षाकरिता निधीचा दुसरा हप्ता देण्याच्या वेळी या लेखापरीक्षेचा अहवाल, लेखापरिक्षकांनी त्यावर मांडलेल्या अभिप्रायावर केलेल्या कार्यवाहीसह देण्यात येईल.

## २८. सामाजिक लेखापरिक्षा :

२८.१ जवाहर ग्राम समृध्दी योजनेचे समाजिक नियंत्रण व्हावे म्हणून जवाहर ग्राम समृध्दी योजनेचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण आणि पर्यवेक्षण यासंबंधात विचारविनिमय करण्यासाठी दर तीन महिन्यांनी ठराविक दिवशी, वेळी आणि ठिकाणी ग्रामसभेच्या बैठकी आयोजित करण्यात येतील. या बैठकी गावातील सर्व लोकांसाठी खुल्या असतील. योजनेच्या अंमलबजावणीतील कोणत्याही बाबींसंबंधात प्रश्न विचारण्याची मुभा त्यांना असेल. जवाहर ग्राम समृध्दी योजनेच्या कार्यन्वयानातील प्रगती आणि इतर सर्व संबंधित बाबींसंबंधीची माहिती ग्रामसभेलाही देण्यात आली पाहिजे.

# प्रकरण पाच
# कार्यक्रमाखालील द्यावयाची मजुरी

## २९. या कार्यक्रमाखालील कामांसाठी द्यावयाची मजुरी :

२९.१ या कार्यक्रमाखालील मजुरी रोख रकमेत देण्यात येईल तथापि, मजुरीचा भाग म्हणून अन्नधान्ये पुरवण्यात यावीत अशी मागणी असेल तर राज्य शासनांना, स्वत:ची स्थानिक व्यवस्था करुन आणि कोणतेही अर्थसहाय्य द्यायचे असेल तर स्वत:च्या साधन संपत्तीचा वापर करुन ( मजुरीचा भाग म्हणून ) अन्नधान्ये देता येतील.

२९.२ रोजगाराच्या प्रवर्गाकरिता ठरवलेली मजुरी ही किमान वेतन अधिनियमाच्या संबंधित अनुसूचिमध्ये अधिसूचित केलेली असेल तेवढी किंवा राज्य शासनांनी विहीत केलेल्या प्रक्रियेनुसार राज्य शासनांनी निश्चित केलेली असेल एवढया अधिक रकमेएवढी असेल. कामगारांना द्यावयाची मजुरी ही एकतर किमान मजुरी किंवा राज्याने ठरवलेली उच्चतर मजुरी यापैकी जी अधिक असेल तेवढया रकमेत दिली जाईल. किमान वेतन अधिनियमामधील एखादे क्षेत्र किंवा रोजगार निरधिसूचित करुन कोणतेही अनवार्य बंधन टाळण्याचा किंवा चुकविण्याचा कोणताही प्रयत्न होऊ नये.

२९.३ किमान वेतन अधिनियमाच्या अनुसार किंवा राज्य शासनाकडून मजुरीचे कोणतेही दर अधिसूचित करण्यात आलेले नसतील तर ग्रामपंचायीला त्या क्षेत्रातील शेत मजुरीच्या चालु दराने कामगारांना वेतन देता येईल.

२९.४ या कार्यक्रमांअंतर्गत पुरुष आणि महिला कामगारांना एकाच किंवा एका स्वरुपाच्या कामासाठी, सारखीच मजुरी देण्यात यावी. या कार्यक्रमांअंतर्गत पुरुष आणि महिला कामगारांची भरती करतेवेळी कोणताही भेदभाव केला जाऊ नये.

२९.५ वरील परिच्छेद २९.२ मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे किमान वेतन अधिनियमाच्या अनुसार किंवा राज्य शासनांकडून काढण्यात येणा-या निरनिराळया

अधिसूचनासंबंधीची माहिती अंमलबजावणी अभिकरणांना तात्काळ उपलब्ध होत नसल्यामुळे, जिल्हा ग्राम विकास अभिकरणे / जिल्हा परिषदा, यांनी, किमानवेतन अधिनियमाखालील रोजगाराच्या विविध संवर्गासाठी विहित केलेले दर किंवा राज्य शासनांनी निश्चित केलेले उच्चतर दर दर्शविणारे एकत्रित परिपत्रक काढावे.

२९.६ ग्राम पंचायत या कार्यक्रमाअंतर्गत कामगारांना विहित केल्याप्रमाणे मजुरी देण्यासाठी जबाबदार असेल.

२९.७ मजुरीचे प्रदान आठवडयातील एका निश्चित केलेल्या दिवशी, जो शक्यतो स्थानिक बाजाराचा दिवस असेल, अशा दिवशी करण्यात यावे.

२९.८ किमान वेतन अधिनियमानुसार संबंध रोजगार अनुसूचीच्या संबंधात अधिसूचति केलेल्या किंवा राज्य शासनाने मान्य केलेल्या दराने अंमलबजावणी प्राधिकरणानी एखाद्या रोजगार प्रवर्गासाठी मजुरी दिली नाही तर अशा प्रकरणात जिल्हा ग्राम विकास अभिकरण, जवाहर ग्राम समृध्दी योजनेअन्वये ग्राम पंचायतींना द्यावयाचा निधी रोखून ठेऊ शकेल.

२९.९ वरील तरतुदींचे पालन केले जात नसल्याचे केंद्र सरकारला आढळून आल्यास केंद्र सरकार संबंधित जिल्हा ग्राम विकास अभिकरणांना / जिल्हा परिषदांना या कार्यक्रमाखाली द्यावयाचा निधी रोखून ठेऊ शकेल.

# प्रकरण सहा

## स्वतंत्र कामे

### ३०. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती यांच्याकरिता लाभार्थीभिमुख स्वतंत्र कार्यक्रम. :

३०.१ प्रकरण तीन मधील परिच्छेद १७.१ मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे ग्रामपंचायतींना दिलेल्या रकमेच्या २२.५ टक्के इतकी रक्कम अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती यांच्यासाठी स्वतंत्र कामे करण्याकरता वापरण्यात येईल. अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींमधील लाभाधिकारी म्हणून निवडलेल्या लाभार्थीसाठी हाती घेता येतील अशा कामांची वर्णनसूची खालीलप्रमाणे आहे :-

### आर्थिक मत्ता :

(एक ) कमाल मर्यादेपेक्षा अधिक असलेली जमीन, भूदान जमीन, शायकीय जमीन ज्यांना वाटपाने देण्यात आल्या असतील त्या वाटपाने दिलेल्या जमिनीचा विकास

(दोन ) अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती यांच्या मालकीच्या खाजगी जमिनीवर जळाऊ लाकूड आणि वैरण यांच्यासाठी लागवड करण्यासारखी सामाजिक वनीकरण कामे.

(तीन ) अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती यांच्या मालकीच्या खाजगी जमिनीवर कृषि उद्यानविद्या, पुष्पसंवर्धन, फळझाडांची लागवड

(चार) कोणत्याही स्वयं-रोजगार कार्यक्रमासाठी काम करण्याकरता छपरी उभारणे किंवा पायाभूत सुविधांची निर्मिती

(पाच) सिंचनासाठी खुल्या विहिरी / कुपनलिका

(सहा ) मत्स्यसंवर्धनासाठी मूलतः साहाय्यकारी ठरतील अशा प्रकारे तळी खोदणे / नव्याने खोदणे.

## जीवनमान सुधारण्यासाठी मत्ता :

(सात ) निवास व्यवस्था

(आठ ) शौचकूप आणि धूररहित चुली

३०.२ एकेका लाभाधिका-यास सतत रोजगार मिळावा म्हणून किफायतशीर मत्तांची तरतूद करण्यास अग्रक्रम देण्यांत यावा. निवास व्यवस्था, शौचकूप, धूररहित चुली इ. सारख्या मत्तांना त्यामानाने नंतरचा क्रम देण्यात यावा आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये त्याबाबत विचार करण्यात यावा.

३०.३ एकेका गरीब व्यक्तीसाठी मत्ता पुरविण्याच्या वेळी, कामामधील त्याचा / तिचा सहभाग असल्याची खात्री करुन घ्यावी.

# प्रकरण सात
# इतर कार्यक्रमांच्या जोडीने वाटचाल

## ३१. गावक-यांचे योगदान :

३१.१ गावातील पायाभूत सुविधांमध्ये विकास करण्यासाठी गावक-यांनी प्रत्यक्ष सहभागी व्हावे किंवा पैशाच्या रुपात मदत करावी म्हणून गावक-यांना उत्तेजन देण्यात यावे. लोकांनी सहभागी होण्याच्या दृष्टीने त्यांच्या मनात सामूहिक मालकीची भावना रुजवून ग्रामपंचायत संबद्ध कायद्यांना अधीन राहून योग्य असा उपकर/ कर लादून जादा साधनसामुग्रीही उभारु शकेल.

## ३२. देणग्या स्वीकारणे :

३२.१ ग्राम पंचायत धर्मादाय संस्था / व्यक्ती यांच्याकडून कार्यक्रमाचा विस्तार करण्यासाठी किंवा ज्यांच्यासाठी निधी आावश्यक आहे. अशा मत्तांचा टिकाऊपणा सुनिश्चित करण्यासाठी देणग्या स्वीकारु शकेल. हा निधी जादा निधी म्हणून समजण्यात येईल आणि कामे पूर्ण करण्यासाठी जवाहर ग्रामसमृध्दी योजनेशी पक्का सांधला जाईल.

## ३३. इतर कार्यक्रमांच्या जोडीने वाटचाल करणे / त्यांच्याशी अनुरुप असे कार्य करणे. :

३३.१ पणन समिती, सहकारी संस्था, उस सहकारी संस्था किंवा इतर संस्था यांसारख्या इतर मार्गानी उपलब्ध होणंरा निधीसुध्दा यांसारख्या प्रयोजनांसाठी जवाहर ग्राम समृध्दी योजनेतील कामांसाठी अनुरुप अशा प्रकारे वापरता येईल. राष्ट्रीय वित्त आयोग, राज्य वित्त आयोग, राज्य विभाग इ. मार्गानी ग्रामपंचायतींना उपलब्ध होणारा निधिसुध्दा कायमस्वरुपी सामूहिक मत्ता/बांधकामे यांवर अनुरुपतेने खर्च करता येईल. तथापि, जवाहर ग्राम समृध्दी योजनेतील निधी हा विविध विभाग आणि अभिकरणे यांचा विभागीय योजना निधी म्हाणून वापरता येणार नाही.

# प्रकरण आठ
# संनियंत्रण आणि मूल्यमापन

## ३४. संनियंत्रण व्यवस्था :

कामाच्या निरिक्षणाचे वेळापत्रक

३४.१ या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी क्षेत्रीय निरिक्षणामार्फत प्रत्यक्ष संनियंत्रण करणे महत्वाचे आहे. राज्य मुख्यालयात जवाहर ग्राम समृध्दी योजनेचे काम पाहणारे अधिकारी जिल्हयांना नियमितपणे भेट देतील आणि या कार्यक्रमाची अंमलबजावणी समाधानकाररीत्या होत आहे आणि विहित प्रक्रिया आणि विनिर्देश यांच्या अनुसार कामे पार पडत आहेत, याबाबत अशा क्षेत्रीय भेटीतून खात्री करुन घेतील. तसेच, जिल्हा, उप-विभाग आणि गट पातळीवरील अधिका-यांनी दूरवरच्या क्षेत्रांमधील कामाच्या ठिकाणांना भेट देऊन या कार्यक्रमाच्या सर्व बाबींच्या संबंधातील संनियंत्रण बारकाईने करणे हे अनिवार्य असेल. राज्य शासनाने गट पातळीपर्यंतच्या प्रत्येक पर्यवेक्षकीय क मेचा-यासाठी कामाच्या क्षेत्रांना द्यावयाच्या किमान भेटी विहित करणारे एक निरिक्षण वेळापत्रक तयार करुन त्याचे कटाक्षाने पालन केले जावे. निरिक्षण करीत असताना कोणत्याही अधिका-याला कोणतीही नियमबाहय गोष्ट दिसल्यास त्याने ती ताबडतोब जिल्हाधिकारी / प्रकल्प संचालक / जिल्हा ग्रामविकास अभिकरण / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे, ज्यामुळे त्या व्यक्तीविरुध्द योग्य ती कार्यवाही करणे शक्य होईल. योग्य ती चौकशी पूर्ण होईपर्यंत जिल्हा प्राधिकारी ग्राम पंचायतीचे हिशोबही जप्त करु शकतील.

## ३५. ग्राम पंचायतीच्या पातळीवरील दक्षता समिती :

३५.१ या कार्यक्रमाखालील प्रत्येक कामाच्या अंमलबजावणीवर देखरेख, पर्यवेक्षण आणि संनियंत्रण करण्यासाठी ग्रामसभा, तिच्या अधिकारितेतील प्रत्येक गावाकरिता, एक दक्षतासमिती नेमेल. या समितीत, या गावात राहणा-या आणि

पंचायतींच्या मतानुसार, तिला या कामात सहाय्यभूत होऊ शकतील.अशा तीन पेक्षा अधिक नसतील इतक्या व्यक्तींचा समावेश असेल. या समितीत अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातींचा किमान एक प्रतिनिधी आणि एक महिला प्रतिनिधीचा समावेश असलाच पाहिजे.

## ३६. राज्य, जिल्हा आणि गट पातळीवर दक्षतां आणि संनियंत्रण समिती. :

३६.१ ग्राम विकास मंत्रालयाच्या निरनिराळया कार्यक्रमांवर देखरेख करण्यासाठी स्थापन केलेल्या संनियंत्रण व दक्षता समितीकडून जवाहर ग्राम समृध्दी योजनेखालील कामांचे गट, जिल्हा आणि राज्य पातळीवर संनियंत्रण करण्यात येईल.

## ३७. अहवाल व विवरणे :

३७.१ मासिक आणि वार्षिक अहवालाचे नमुने - केंद्र सरकारला विहित करता येतील. राज्य शासन त्याची इच्छा असल्यास त्याला योग्य वाटेल अशी अधिक माहिती, त्याला योग्य वाटेल अशा नमुन्यात मागवू शकेल.

३७.२ जिल्हा ग्राम विकास अभिकरणे / जिल्हा परिषदा यांच्याकडून केंद्र शासनाला पुढील अहवाल व विवरणे सादर केली जातील.

(एक) प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत प्रपत्र - एक मध्ये सादर करावयाच्या अगोदरच्या महिन्याचा मासिक प्रगती अहवाल.

(दोन ) पुढील वर्षाच्या २५ एप्रिलपर्यंत सादर करावयाचा तपशीलवार वार्षिक अहवाल, या प्रयोजनार्थ प्रपत्र - दोन वापरण्यात येईल.

३७.३ या अहवालांमुळे केंद्र आणि राज्य या दोन्ही पातळयांवरील प्राधिका-यांना कार्यक्रमाच्या प्रगतीवर संनियंत्रण ठेवता येईल, तसेच त्यामधून निर्माण झालेल्या पायाभूत सुविधा, निर्माण झालेला रोजगार आणि अंमलबजावणीचा दर्जा व त्यातील पध्दत यांच्यासंबंधात बारकाईने लक्ष ठेवून मध्यावधी सुधारणा करणे शक्य होईल.

## ३८. ग्राम पंचायत पातळीवर जवाहर ग्राम समृध्दी योजनेची सामाजिक लेखापरिक्षा :

३८.१ जवाहर ग्राम समृध्दी योजनेखाली हाती घेण्यात आलेल्या कामांची सामाजिक लेखापरीक्षा प्रकरण चार च्या परिच्छेद २८.१ च्या अनुसार सुनिश्चित केली जाईल.

## ३९. मूल्यमापन परिनिरिक्षण :

३९.१ राज्य/संघराज्य क्षेत्रे या कार्यक्रमाच्या कार्यान्वयनावरील नियतकालिक मूल्यमापन परिनिरिक्षण करतील.

३९.२ समवर्ती मूल्यमापनामध्ये उपस्थित करण्यात आलेल्या व ज्यांच्या बाबतीत सखोल परिनिरीक्षण करणे आवश्यक आहे अशा मुद्यांच्या बाबतीत मूल्यमापन परिनिरिक्षण करण्याचे काम नामांकित संस्थांना आणि संघटनांना देण्यात येईल. अशा प्रकारचे परिनिरीक्षण केंद्राकडून तसेच राज्यांडून / संघराज्य क्षेत्राकडून करण्यात येईल. राज्य शासनाने केलेल्या मूल्यमापन परिनिरिक्षणाच्या प्रती केंद्र शासनाकडे पाठवण्यात याव्यात.

३९.३ या मूल्यमापन परिनिरीक्षणात काढलेले निष्कर्ष आणि भारत सरकारकडून आयोजित करण्यात आलेल्या समवर्ती मूल्यमापनाचे निष्कर्ष यांच्या आधारावर राज्याकडून / संघराज्यक्षेत्रांकडून सुधारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

# प्रकरण नऊ
## संकीर्ण

### ४०. कर्मचारीवर्गाचे प्रशिक्षण :

४०.१ वेगवेगळया पातळयांवरुन जवाहर ग्राम समृध्दी योजनेची कामे हाताळणा-या अधिका-यांना आवश्यक ते दिशा निर्देशन करण्यासाठी राज्य/जिल्हा ग्राम विकास अभिकरण / पंचायत समिती / मध्यम पातळीवरील पंचायत / ग्राम पंचायत पातळीवर विभीन्न पातळीवर प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्या प्रयोजनार्थ नियमित प्रशिक्षण कार्यशाळा / कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

४०.२ कौन्सिल फॉर अॅडव्हान्समेंट ऑफ पीपल्स अॅक्शन अॅंड रुरल टेक्नालॉजी, केंद्रीय बांधकाम संशोधन संस्था, केंद्रीय मार्ग संशोधन संस्था, राज्य पातळीवरील योग्य त्या तंत्रशिक्षण संस्था, विद्यालये, राज्य ग्रामीण विकास संस्था यासारख्या संस्थांना आणि सक्षम बिनसरकारी संघटना यांचा राज्य पातळीवर प्रशिक्षण आयोजित करतेवेळी त्यात समावेश करावा. यामुळे विविध पातळीवरील कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी त्यांच्या ज्ञानांचा उपयोग करन घैता येईल. योग्य प्रकारचे तंत्रज्ञान आणि उच्च प्रतीच्या श्रमप्रधान व्यवस्थेमधून विकसित करण्यात आलेली कमी खर्चाची तंत्रे यांच्या संबंधातील जाणीव निर्माण करणे व त्याबरोबरच ती तशी कायम राहील हे पाहणे हे या प्रशिक्षणाचे उदिदष्ट आहे. त्याखेरीज, जवाहर ग्राम समृध्दी योजनेच्या अंमलबजावणीशी संबंधित अधिकारी / कर्मचा-यांना प्रशिक्षण देते वेळी, काम कसे करावयाचे त्या कार्यान्वयनाचे तपशील त्यांना स्पष्ट करुन सांगितले पाहिजेत.

### ४१. कामाच्या ठिकाणच्या सुविधांची तरतूद :

४१.१ कामगारांकरिता पिण्याचे पाणी, विश्रांती घेण्यासाठी छपरी इ.सोयी पुरविण्याची तसेच महिला कामगांरांबरोबर येणा-या त्यांच्या बालकांसाठी पाळणागृहांची व्यवस्था करण्यात यावी या सुविधा पुरविण्याचा खर्च या योजनेखलील वेतनेतर घटकामधून भागविण्यात यावा.

## ४२. तक्रारीचे निराकरण :

जवाहर ग्राम समृध्दी योजनेची अंमलबजावणीच्या संबंधात, कार्यान्वयन अधिका-यांकडून, योग्य ती मजुरी न देण्यासंबंधात असेल तर तिच्यासह कोणतेही गा-हाणे असल्यास, ते दूर करण्यासाठी वरिष्ठ प्राधिकरणांकडे अभिवेदन करण्यात येईल. पंचायतीकडून पार पाडलेल्या कामाच्या संबंधात, गट विकास अधिकारी, प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्राम विकास अभिकिरण, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा किंवा जिल्हयाचा जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन करता येईल. अशावेळी या अभिवेदनाबाबत चौकशी करण्याची आणि यथोचितरीतीने त्याचे निरसन करण्याची जबाबदारी या अधिका-यांची असेल.

# ग्राम पंचायतींना करावयाच्या वाटपासंबंधीचे परिगणना पत्र

अशी कल्पना करा की एका जिल्हयात अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीचे लोक असलेली अ,ब,क व ड ही चार गावे आहेत. खालील तक्त्यात एकूण लोकसंख्या (१९९१ च्या जनगणनेनुसार )दिलेली आहे. त्या जिल्हयाच्या ग्रामपंचायतींना वितरणासाठी उपलब्ध असलेली ग्राम समृध्दी योजनेची साधनसंपत्ती रु.१० लाख एवढी आहे. विहित निकषानुसार एखाद्या ग्रामपंचायतीचा हिस्सा खाली दिल्याप्रमाणे काढता येईल.

१९९१ च्या जनगणनेनुसार प्रत्यक्ष लोकसंख्या — मानलेली लोकसंख्या (१००० हून कमी लोकसंख्या असलेल्या गावांसाठी केवळ )

| क्रमांक | ग्रामपंचायतीचे नाव | अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीची लोकसंख्या | एकूण लोक संख्या | अनुसुचित जाती/ अनुसुचित जमातीची संख्या | | एकूण लोक संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अ | ३२० | ८०० | ४०० | ३२०/८०० X१००० | १००० |
| २. | ब | ८०० | २००० | ८०० | | २००० |
| ३. | क | ३००० | १०००० | ३०० | | १०००० |
| ४. | ड | ४५०० | १५००० | ४५०० | | १५००० |
| | एकूण | | | ८७०० | | २८००० |

(एक) जवाहर ग्राम समृध्दी योजनेची एकूण साधनसंपत्ती : रु. १० लाख

(दोन) एकूण लोकसंख्येनुसार दरडोई पात्रता — १०००००० X ४० टक्के / २८००० रु.१४.२८

(तीन) अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येनुसार दरडोई पात्रता — १०००००० X ६० टक्के / ८७००

रु. ६८.९

| क्रमांक | गावांचे नांव | अनुसूचित जाती/जमातीच्या लोकसंख्येनुसार हक्कदारी<br>६८.९६Xअनुसूचित जाती/ जमातीची लोकसंख्या | एकूण लोकसंख्येनुसार हक्कदारी<br>१४.२८Xएकूण लोकसंख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | अ | २७,५८४ | १४,२८० | ४१,८६४ |
| २. | ब | ५५,१६८ | २८,५६० | ८३,७२८ |
| ३. | क | २,०६,८८० | १,४२,८०० | ३,४९,६८० |
| ४. | ड | ३,१०,३२० | २,१४,२०० | ५,२४,५२० |

# परिच्छेद ८-१ (ब) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसरा व त्यानंतरचा हप्ता देण्यासाठी केलेले प्रस्ताव.

१. अभिकरण / जिल्हा परिषद याचे नाव व संपूर्ण पत्ता.

२. जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण / जिल्हा परिषद यामधील ग्रामपंचायतींची संख्या

३. ग्राम पंचायतीच्या बाबतीत चालू वर्षामध्ये कृती योजनेला मान्यता दिलेली आहे किंवा कसे

४. या वर्षामध्ये ग्रामपंचायतींसाठी दिलेला वाढीव निधी

| | | चालू वर्ष | मागील वर्ष |
|---|---|---|---|
| (अ) | देण्यात आलेला एकूण निधी | | |

५. मागील वर्षाचे जवाहर ग्राम समृध्दी योजनेच्या निधीचा वापर केल्याचे प्रमाणपत्र भारत सरकारकडे पाठविण्यात आले आहे किंवा कसे (प्रत जोडावी)

६. मागील वर्षी ग्राम पंचायतींकडून प्राप्त झालेल्या अहवालांवर आधारित लेखापरीक्षा अहवाल प्राप्त झालेला आहे किंवा कसे (एक प्रत)

७. खर्चाचा तपशील

| | बाबी | चालू वर्ष | | | | मागील वर्ष | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण | अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती | परिक्षण | एकूण | सर्वसाधारण | अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती | परिक्षण | एकूण |
| (एक) | मागील वर्षातील खर्च न केलेला निधी | | | | | | | | |
| (दोन) | ...... या वर्षी देण्यात आलेला' निधी | | | | | | | | |
| (तीन) | एकूण उपलब्धता (एक) + (दोन) | | | | | | | | |
| (चार) | वर्षाचा खर्च | | | | | | | | |
| (पाच) | खर्च न केल्यामुळे पुढील वर्षाकाठी राहिलेला निधी | | | | | | | | |
| (सहा) | उपलब्ध असलेल्या निधीशी खर्च न केलेल्या निधीची टक्केवारी | | | | | | | | |

*जोडपत्र तीन*

# (उपयोजन) प्रमाणपत्र
# (परिच्छेद ८.१ (ब) (सहा)

जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण/जिल्हा परिषद......................
............... वर्षाचे उपयोजन प्रमाणपत्र
(अ) ............ या मागील वर्षी खर्च न केलेली शिल्लक रक्कम
(ब) ............ या वर्षी प्राप्त झालेली अनुदाने

.................. जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण/जिल्हा परिषदेला ..................यां वर्षात राज्य शासनाकडून सहायक अनुदान म्हणून रु.......... लाख (रुपये .......) (मंत्रालयाचे पत्र व दिनांक समासात दिले आहे ते कृपया पहावे) ................ या मागील वर्षातील खर्च न केलेली शिल्लक राहिलेली............. (रु........ फक्त) एवढी अतिरिक्त रक्कम यापुढे चालू वर्षासाठी वापरण्याची परवानगी देण्यांत आली होती. अभिकरणाची ............ या वर्षातील संकीर्ण प्राप्ती रु............ लाख इतकी होती.

वर उल्लेख केलेला रु..............(रु.............)एवढा एकूण निधी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आला होता. त्याच्यासाठीच जिल्हा ग्रामविकास अभिकरण/ जिल्हा परिषद व ग्राम पंचायत यांनी......... या वर्षासाठी वापरलेला आहे असे प्रमाणित करण्यात येत आहे. तसेच असेही प्रमाणित करण्यात येते की, या वर्षाअखेर खर्च न केलेल्या रु.........
(रु..........) इतक्या शिल्लक रकमेचा पुढील वर्षाच्या कार्यक्रमासाठी वापर केलेला आहे.

(२) ज्या अटीवर सहायक अनुदान मंजूर करण्यात आले त्या सर्व शर्ती मी यथोचितरित्या पूर्ण केलेल्या आहेत/ करण्यात येत आहेत. हे प्रमाणीत करण्यात येत आहे आणि ज्या प्रयोजनासाठी ते मंजूर करण्यात आले त्याचसाठी त्याचा प्रत्यक्ष वापर झालेला आहे हे पहाण्यासाठी मी खालील कसोटयांचा वापर केलेला आहे.

## वापरलेल्या कसोटया

(एक) अभिकरणाचे .........या वर्षाचे सनदी लेखपालाने यथोचितरीत्या लेखापरीक्षित केलेले लेखापालाचे विवरणपत्र प्राप्त झालेले असून ते मंजूर झालेले आहे.

(दोन) विहित केलेल्या वर्षाचे या जिल्हयातील सर्व पंचायतींच्या बाबतीतले उपयोजन प्रमाणपत्र व लेखापरीक्षा / निरिक्षण प्रतिवेदन प्राप्त झालेले असून त्यांची यथोचितरीत्या छाननी करण्यात आली आहे.

(तीन) जवाहर ग्राम समृद्धी योजनेचे प्रत्यक्ष व वित्तीय कार्य भारत सरकारने / राज्य सरकारने काढलेल्या मार्गदर्शक सूचीमध्ये विहित केलेल्या आवश्यकतेनुसार झालेले आहे.

दिनांक

प्रकल्प अधिकारी / जिल्हा ग्राम
विकास अभिकरण/जिल्हा परिषदेचा
प्रमुख कार्यकारी अधिकारी

# जवाहर ग्राम समृद्धी योजने अंतर्गत दुसरा हप्ता देण्याची तपासणी सूची

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्ह्याचे नाव | |
| २. | सध्या उपलब्ध असलेल्या निधीच्या ६० टक्के रक्कम जिल्ह्याने खर्च केली आहे किंवा कसे. | होय/नाही |
| ३. | प्रारंभिक शिल्लक ही मागील वर्षात जिल्ह्याला वाटणीच्या २० टक्क्यांपेक्षा अधिक आहे किंवा काय | होय/नाही |
| ४. | उपयोजन प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा कसे | होय/नाही |
| ५. | जवाहर ग्राम समृद्धी योजनेचा लेखापरीक्षा अहवाल सादर केला आहे किंवा कसे | होय/नाही |
| ६. | अनुसूचित जाती / अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवलेल्या क्षेत्रांवर होणारा खर्च दाखवणारे विवरणपत्र जोडलेले आहे किंवा कसे. | होय/नाही |
| ७. | ना-अपहार प्रमाणपत्र, अन्य प्रयोजनार्थ वापर न केल्याबद्दलचे प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे किंवा कसे. | होय/नाही |
| ८. | बँकेच्या बचत खात्यामध्ये निधी ठेवण्यासाठी प्रमाणपत्र सादर करण्यात आले आहे किंवा कसे. | होय/नाही |
| ९. | राज्याकडून तेवढ्याच रकमेच्या हिश्याची रक्कम देण्यात आली आहे किंवा कसे. | होय/नाही |